## प्रेस नोट दिनांक - ०१/०९/२०१९

## पुणे व औरंगाबाद येथे घरफोडी व चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास मुद्येमालासह अटक.

---

काल दिनांक ३१/०८/२०१९ युनिट - १ गुन्हे शाखे कडिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरूण वायकर, पोउनि शिंदे, पो हवा जिनेडी, पो हवा थोरात, पो ना खडके, पो हवा घाडगे, पो शि माळवदकर, पो ना मोमीन असे शिवाजीनगर एस टि स्टॅण्ड परिसरात पेट्रोलिंग करीत होते.

त्याचवेळी शिवाजीनगर पो स्टे कडिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळासाहेब कोपनर, पो शि होळकर, सफौज मेमाणे हे देखील तेथे आले व हे सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी हे एस टी स्टँडवरील सीसीटीव्ही कॅमे-यांच्या जागा व व्याप्तीबाबत आगार व्यवस्थापक श्री.भिसे यांचेसह पाहणी करत असताना एस टि स्टँडवर अचानक काही नागरीक चोर चोर म्हणत पळतांना दिसले. त्यामुळे वरील स्टाफतील अधिकारी व कर्मचा-यांनी तात्काळ हस्तक्षेप करुन त्या चोरटयास ताब्यात घेतले.

त्याचे नांव पत्ता - सय्यद हनिफ सय्यद हबीब, वय २० वर्षे, रा.रोशन गेट मस्जिद समोर, औरंगाबाद असे असुन त्याचे अंगझडतीमध्ये त्याने चोरी केलेला मोबाईल फोन, तसेच सोन्याचे दागिणे त्यामध्ये एक नेकलेस, एक मंगळसुत्र, कानातील रिंगा, व रोख पाच हजार रूपये असा एकुण रु. ४९,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला.

त्याबाबत आरोपीकडे तपास करता सदर मोबाईल त्याने बुधवार पेठेतून चोरल्याचे व सोण्याचे दागीने हे त्याने दिनांक-३०/०८/२०१९ रोजी औरंगाबाद येथे केलेल्या घरफोडीतील असल्याचे कबुल केलेले आहे.

दोन्ही घटनांबाबत फरासखाना पो स्टे गुन्हा रजि नं ३०८/२०१९ भादवि क ३७९ प्रमाणे व औरंगाबाद येथील जिन्सि पो स्टे ला गुन्हा रजि नं ३४४/२०१९ भादविक ४५७, ३८० प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

सदर आरोपी विरुध्द यापुर्वीचे चो-या व हाणामारीचे एकुण अनेक गुन्हे नोंद असुन त्याचे विरुध्द जिन्सी पोलीस ठाणे औरंगाबाद कडून तडीपारीची कारवाई सुध्दा करणेत आली होती.

सदर घटनेसंदर्भातील कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.बच्चनसींग सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, व डॉ.श्री.शिवाजी पावार, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.